जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 AUG 2024

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठाचे सेट परीक्षेत यश

## पदार्थ विज्ञान अधिविभागाचे सर्वाधिक २९ विद्यार्थी उत्तीर्ण

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

एप्रिल-२०२४ मध्ये घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (सेट) मध्ये शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिविभागांतील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले. पदार्थ विज्ञान अधिविभागाचे सर्वाधिक २९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. सहायक प्राध्यापक पदासाठी महत्त्वाची असलेली महाराष्ट्र-राज्यस्तरीय पात्रता चाचणी (एम.एच.-सेट) ७ एप्रिल २०२४ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे घेण्यात आली होती.

सेट परीक्षेमध्ये पदार्थ विज्ञान अधिविभागाखालोखाल गणित अधिविभागाचे २७ आणि संख्याशास्त्र अधिविभागाचे २४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्याखालोखाल शिक्षणशास्त्र अधिविभागाचे १०, सूक्ष्मजीवशास्त्र, अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र अधिविभागाचे प्रत्येकी ८, रसायनशास्त्र अधिविभागाचे ७, इलेक्ट्रॉनिक्सचे ६, पर्यावरणशास्त्र व इतिहासाचे प्रत्येकी ५, समाजकार्य विषयाचे ३, समाजशास्त्र, जीवरसायनशास्त्र आणि वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र अधिविभागांचे प्रत्येकी २, तर जैवतंत्रज्ञान व मानसशास्त्राचे प्रत्येकी १ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. महत्त्वाचे म्हणजे यंदा दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामधून शिकलेल्या विद्यार्थ्यांनीही सेट परीक्षेत उत्तम यश मिळवले. केंद्राचे एकूण १४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यामध्ये अर्थशास्त्राचे ५, राज्यशास्त्राचे ४, समाजशास्त्राचे ३ आणि इतिहासाचे २ विद्यार्थी आहेत. उत्तीर्ण विद्यार्थी-विद्यार्थिनींसह त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी अभिनंदन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 AUG 2024
पुढारी

# विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी 'सेट' परीक्षेत मारली बाजी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राज्यस्तरीय पात्रता परीक्षा तथा सेट परीक्षेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिविभागांतील विद्यार्थ्यांनी यश मिळवित बाजी मारली आहे. पदार्थविज्ञान अधिविभागाचे सर्वाधिक २९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

सहायक प्राध्यापक पदासाठी महत्त्वाची असलेली महाराष्ट्र-राज्यस्तरीय पात्रता चाचणी (एम.एच.-सेट) ७एप्रिल २०२४रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने घेण्यात आली. या परीक्षेत विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. पदार्थविज्ञान अधिविभागाखालोखाल गणित अधिविभागाचे २७ व संख्याशास्त्र अधिविभागाचे २४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. शिक्षणशास्त्र. अधिविभागाचे १०, सूक्ष्मजीवशास्त्र, अर्थशास्त्र व राज्यशास्त्र अधिविभागाचे प्रत्येकी ८, रसायनशास्त्र अधिविभागाचे ७,

- **पदार्थविज्ञान अधिविभागाचे सर्वाधिक २९ विद्यार्थी उत्तीर्ण**

इलेक्ट्रॉनिक्सचे ६, पर्यावरणशास्त्र व इतिहासाचे प्रत्येकी ५, समाजकार्य विषयाचे ३, समाजशास्त्र , जीवरसायनशास्त्र आणि वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र अधिविभागांचे प्रत्येकी २ तर जैवतंत्रज्ञान व मानसशास्त्राचे प्रत्येकी १ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामधून शिकलेल्या विद्यार्थ्यांनीही सेट परीक्षेत उत्तम यश मिळविले आहे. या केंद्राचे १४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून त्यामध्ये अर्थशास्त्राचे ५, राज्यशास्त्राचे ४, समाजशास्त्राचे ३ व इतिहासाचे २ विद्यार्थी आहेत. उत्तीर्ण विद्यार्थी-विद्यार्थिनींसह त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांचे कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील व कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी अभिनंदन केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत
09 AUG 2024

# विद्यापीठातील १६२ विद्यार्थी सेट उत्तीर्ण

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : एप्रिल-२०२४मध्ये घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय पात्रता परीक्षा तथा सेट परीक्षेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिविभागांतील १६२ विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळविले असून, पदार्थविज्ञान अधिविभागाचे सर्वाधिक २९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

सहाय्यक प्राध्यापक पदासाठी महत्त्वाची असलेली महाराष्ट्र-राज्यस्तरीय पात्रता चाचणी (एम.एच.-सेट) ७ एप्रिल २०२४ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने घेण्यात आली. या परीक्षेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान अधिविभागातील २९, गणित अधिविभागाचे २७ आणि संख्याशास्त्र अधिविभागाचे २४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. शिक्षणशास्त्र अधिविभागाचे १०, सूक्ष्मजीवशास्त्र, अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र अधिविभागाचे प्रत्येकी ८, रसायनशास्त्र अधिविभागाचे ७, इलेक्ट्रॉनिक्सचे ६, पर्यावरणशास्त्र व इतिहासाचे प्रत्येकी ५, समाजकार्य विषयाचे ३, समाजशास्त्र, जीवरसायनशास्त्र आणि वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र अधिविभागांचे प्रत्येकी २ तर जैवतंत्रज्ञान व मानसशास्त्रातील प्रत्येकी १ विद्यार्थी उत्तीर्ण झाला आहे. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातून शिकलेल्या विद्यार्थ्यांनीही सेट परीक्षेत उत्तम यश मिळविले आहे. या केंद्राचे एकूण १४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, त्यामध्ये अर्थशास्त्राचे ५, राज्यशास्त्राचे ४, समाजशास्त्राचे ३ आणि इतिहासाचे २ विद्यार्थी आहेत.

सर्व उत्तीर्ण विद्यार्थी-विद्यार्थिनींसह त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांचे कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे यांनी अभिनंदन केले.

09 AUG 2024
जनसंपर्क कक्ष
तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# एखादा विषय निवडून त्यामध्ये अव्वल बना


## डॉ. पी. टी. गायकवाड : .माने महाविद्यालयात युवा महोत्सव कार्यशाळा

प्रतिनिधी
कागल

तुमच्यात खूप टॅलेंट आहे. त्यामुळे स्वत?ला कधीही कमी लेखू नका. विद्यापीठाच्या युवा महोत्सवात ३७ हून अधिक इव्हेंटचा समावेश आहे. यातील एकाची निवड करून त्यासाठी चांगले योगदान द्या. प्रमाणिकपणे काम केल्यास निश्चित यशस्वी व्हाल असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. पी. टी. गायकवाड यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास विभाग आणि डी. आर. माने महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमान एक दिवसीय युवामहोत्सव माहिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते .

डॉ. पी. टी. गायकवाड पुढे म्हणाले, युवा महोत्सवाच्या निमित्ताने तुमच्यातील कला गुणांचा शोध घेतला जाणार आहे..शिवाजी विद्यापीठाच्या युवा महोत्सवात ३७ हून अधिक इव्हेंट असतात . विद्यापीठही त्यासाठी कार्यरत आहे. यासाठी तुम्हाला आवश्यक गोष्टींची मागणी करा. विद्यापीठ जरूर त्यांची पुर्तता करेल. या क्षेत्रात चांगला आनंद मिळतो. एखादा विषय निवडून त्यामध्ये अव्वल बना असेही डॉ. गायकवाड यांनी सांगितले .



**कागल : येथील डी. आर. माने महाविद्यालयात आयोजित युवा महोत्सव कार्यशाळेत बोलताना शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. पी. टी. गायकवाड.**

प्रभारी प्राचार्या डॉ. निला जोशी, सिनेट सदस्य अमरसिंह रजपूत, डॉ. आदिनाथ गाडे, समन्वयक हसीना मालदार यांनी मनोगते व्यक्त केली. सचिव भैय्या माने, उपाध्यक्ष सनील माने ,कॅम्पस डायरेक्टर डॉ. प्रवीण चौगुले यांचे मार्गदर्शन लाभले. सूत्रसंचालन प्रा. अंजली पाटील व डॉ. सरस्वती गायकवाड यानी केले. आभार प्रा . संदीप वाडीकर यानी मानले. यावेळी डॉ . आर . एच . अतिग्रे, दिपक बिडकर, प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
09 AUG 2024 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


रेवती पाटील


अस्मिता मोरे


भक्तिभावना कोळेकर


मेघा पाटील


अनिकेत चव्हाण

# डी.वाय.पी. साळोखेनगरचे २२ विद्यार्थी शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत

**पाचगाव : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाकडून घेण्यात आलेल्या उन्हाळी परीक्षेमध्ये साळोखेनगर येथील डॉ. डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या २२ विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीमध्ये स्थान मिळवले. यामध्ये डाटा सायन्स विभागाची रेवती पाटील, सिव्हिलची अस्मिता मोरे, इलेक्ट्रिकलची भक्तिभावना कोळेकर यांनी प्रथम क्रमांक पटकावला.

यामध्ये डाटा सायन्सचे १०, सिव्हिल इंजिनिअरिंगचे ५, कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंगचे २, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगचे ५ असे २२ विद्यार्थी गुणवत्ता यादीमध्ये आले आहेत.

महाविद्यालयाच्या डाटा सायन्सच्या रेवती पाटील (प्रथम), दिशा शिंदे (द्वितीय), मयुरेश भंडारी (तृतीय), पीयूष काटकर (चौथा), श्रेयश फणसाळकर (पाचवा), पीयूषा साजणे (सहावा), राफिआ मुल्ला (सातवा), अपूर्वा देसाई (आठवा), खुशी माने (नववा), स्वरूप पाटील (दहावा), सिव्हिल इंजिनिअरिंगच्या अस्मिता मोरे (प्रथम), मेघा पाटील (तृतीय), वैष्णवी गुंजवटे (आठवा), पूजा यादव (नववा), इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगच्या भक्तिभावना कोळेकर (प्रथम), दिव्या तिबिले (चौथा), संध्या सुतार (सातवा), नम्रता पाटील (नववा), प्रसाद जाधव (दहावा), तर कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंगच्या अनिकेत चव्हाण (सहावा) व शिवम चौगले (दहावा) यांनी गुणवत्ता यादीमध्ये स्थान मिळवले आहे. सध्या या कॉलेजमध्ये जिल्ह्यातील बाराशे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

या सर्व विद्यार्थ्यांना संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, उपाध्यक्ष आमदार सतेज पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. विश्वस्त देवश्री पाटील, आमदार ऋतुराज पाटील, तेजस पाटील, कार्यकारी संचालक डॉ. अनिलकुमार गुप्ता, प्राचार्य डॉ. सुरेश डी. माने, कॅम्पस संचालक डॉ. अभिजित माने, सुयोग पाटील, प्राध्यापक यांनी गुणवत्ता यादीत झळकलेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.